नि.फौ.ख.क्र७४/२०१६
सरकार वि. विकास
नि.क.२४

**सरकार पक्षा तर्फे साक्षीदार क.४  यांची जबानी**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक कथन करतो/करते की,

माझे नाव : शैलेश भाउराव बेले
वय : ४५ वर्षे, व्यवसाय : पोलीस नाईक
राहणार : पोलीस स्टेशन मौदा, जि. नागपूर

**सर तपास सरकारी अभियोक्ता श्री. मरसकोल्हे यांचे मार्फत :-**

मी दि.२८.५.२०१६ रोजी पोलीस स्टेशन उमरेड येथे पोलीस नाईक या पदावर कार्यरत होतो. मी आरोपीचा वैद्यकीय मुलाहिजा करिता ग्रामीण रूग्णालय मध्ये नेले होते. मी त्यांचे रक्ताचा नमुना आणला होते. डॉ. गुरणवार यांनी आरोपीची वैद्यकीय तपासणी केली होती. आता मला मुलाहीजा फॉर्म दाखविण्यात आला, त्यावर माझे नाव आहे. त्यावर प्राप्त झाल्याची माझी सही आहे. त्याला नि.२५ देण्यात येते.

त्यानंतर डॉक्टरांनी बी-फॉर्म भरून दिला व आरोपीच्या रक्ताचा नमुना काचेच्या बॉटलमध्ये दिला. तो सि.ए. परिक्षणाकरीता दिला होता. तपास अधिकारी यांनी तो सि.ए. परिक्षणाकरिता पाठविला होता. मी आरोपीला ओळखतो तो आज रोजी न्यायालयात हजर आहे.

**उलट तपास आरोपीतर्फे वकील श्री. खाटीक यांचेमार्फत :-**

हे म्हणणे खरे आहे की, सि.ए. परिक्षणाकरिता लागलेले दस्त न्यायालयात जमा असतात. हे म्हणणे खरे नाही की, माझेसमक्ष कोणत्याही

प्रकारची सि.ए. ची कार्यवाही झाली नाही व मला कोणतेही दस्त दिले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीला ओळखत नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझी जेथे नौकरी असते तेथील लोकांना मी ओळखतो. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीसोबत माझा परीचय आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीविरूध्द खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटा मुलाहिजा फॉर्म दाखल केला व खोटी एमएलसी दाखल केली.

**फेर तपास काही नाही.**

वा.दा.ब.अ.क.केले                                                समक्ष

न्या.दं.प्र.श्रे.                                                (ए.व्ही. पंडित)
उमरेड                                                न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड
दि : १७.०२.२०२१